ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 4 | May - 2016

Indian Streams Research Journal



# नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्रीविशयक संवेदन

डॉ. कविता मुरुमकर

**प्रस्तावना :**

नामदेव ढसाळ हे मराठी व भारतीय साहित्यातील सिध्दहस्त लेखक. दलितांच्या व्यथा वेदनाना वाचा फोडून नामदेव ढसाळ यांनी दिलतांच्या अनेक प्रश्नांवर तीव्र आंदोलने केली व दलित चळवळीला एक आक्रमक चेहरा दिला. याच काळात उदयाला आलेल्या 1973 मध्ये प्रकाशित झालेल्या नामदेव ढसाळांच्या 'गोलपिठां' या काव्यसंग्रहाने मराठी सारस्वतांना उपेक्षितांच्या जगाचं, दुःखांचं, संतापाचं दर्शन घडविले. 'गोलपिठा' ही मराठी साहित्यातील महत्वपूर्ण कलाकृती ठरली. त्यानंतर 'तुही इयत्ता कंची', 'या सत्तेत जीव रमत नाही', 'गांडू बगीचा', 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी', 'खेळ', 'मी मारले सुर्याच्या रथाचे सात घोडे', 'तुझे बोट धरुन चाललो आहे मी' इत्यादी कवितासंग्रह व 'हाडकी हाडवळा', निगेटिव्ह स्पेस' या कादंबऱ्या लिहिल्या. 'आंधळे शतक', 'आंबेडकरी चळवळ' आणि सोशालिस्ट कम्युनिस्ट तसेच 'बुध्दधर्म आणि शेषप्रश्न ' हे चिंतनपर लेखन नामदेव ढसाळांनी केले. 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले' हा काव्यसंग्रह माओइस्ट विचारांवर आधारित आहे. 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रः प्रियदर्शनी 'हा काव्यसंग्रह इंदिरा गांधी यांच्यावर आधारित आहे. नामदेव ढसाळांच्या अभिव्यक्तीला केवळ दलित वेदनेचीच नव्हे तर वैश्विक वाङ्‌मयीन जाण आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय राजकारण, समीक्षा, दलित चळवळीच्या जाणिवा याविषयी त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या या साहित्यिक कामगिरीचा भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री देवून सन्मान केला आहे.

'बाई : गूढ राहिली कायमची माझ्यासाठी' असं म्हणणाऱ्या नामदेव ढसाळ यांनी खऱ्या अर्थाने बाईचे वैश्विक रहस्यमय अंतरंग जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मराठी काव्यपरंपरेत बहुतांशी कवींनी आई, प्रेयसी, पत्नी या स्त्रीविषयक भूमिका शब्दचित्रीत करताना आई विषयीचा मन्हमंगलभाव, प्रेयसी व पत्नीचं विलोभनीय रुप याचाच विचार केला आहे. मात्र नामदेव ढसाळांनी या काव्यपरंपरेला छेद दिला आहे. समस्त बाईजातीचे संवेदनशील अंतरंग जाणून घेताना त्यांनी आपल्या कवितेलाच विनंती केली आहे की,

**'माझ्या कविते,**
**दिवा विझवून तळमळत राहणाऱ्या**
**बाईला जाणून घे...**
**माझ्या कविते, तू टिपून, घे**
**समस्त बाईजातीचे दुखणे !**

आपला उद्रेक, संताप, संवेदना, विचार, तत्वज्ञान सारं काही पणाला लावून हा कवी बाईपणांच गूढ जाणून घेत 'बाई' या वैश्विक रहस्याचे कंगारे आपल्या कवितेतून संवेदनशीलपणे टिपत राहतो. बाईची वेदना करुणा, तडफड, संघर्ष याची विलक्षण जाणीव नामदेव ढसाळांना सतत होत असते. म्हणून तर ढसाळांची संतापी, उद्रेकी कविता अचानक हळवी, करुण्यमयी होऊन जाते. 'आई' या कवितेत ते लिहतात,

**'आई गेली याचं दुःख नाही,**
**दुःख याचं आहेः अज्ञानाच्या घोशाआत**
**तिने आयुश्याच्या वाटाघाटी केल्या...**
**कष्ट । खस्ता उपसल्या । भोगल्या**
**शिळया भाकरीचे तुकडे मोडून**
**चिक्कार पाहिलं भोगलं आईनेही**
**शहरातही तिने तवलीत अन्न शिजवलं,**
**पैठणीचे रंग न्याहळता न्याहळता**
**जुनेराला थिगळ लावलं...'**

दारिद्रयाचे पाय झाकत, लक्ष्मीपूजनाला दारिद्रयरुप पुजणारी आई दुःख दारिद्रयातही आपली श्रध्दा डळमळीत होऊ देत नाही, म्हणून बाई 'अनाकलनीय' आहे. मुलीच्या जन्माला नकार देणाऱ्या वास्तवतेवर भाष्य करुन,

**'मला हवा होता हात तुझा**
**कोसळताना आधारासाठी**
**नसलेल्या परमेश्वराजवळ**
**गुडघे टेकून मागायची होती क्षमा**
**आयुष्यातल्या सर्व गुन्हयांची'**

व्यवस्थेला चपराक देऊन ढसाळ 'बहीण' या कवितेत म्हणतात,

**'स्वतःच्या सुरक्षिततेची जागा**
**आईने भाोधली नाही स्वतःच्याच गर्भाशयात**
**पाठीवर पाय देत जेव्हा माझी बहीण जन्माला आली,**
**तेव्हा तिने तिचं कौतुक केलं**
**मुलगी जन्माला आली की,**
**तिच्या नरडीला नख देण्याऱ्यांच्या जगात**
**तसं हे नवीनच होतं !**

'आईच्या समजुतीसाठी' या कवितेत मातृत्वाचे महन्मंगल स्तोत्र गाणाऱ्या काव्यपरंपरेला छेद देवून एका युयुत्सू, क्रांतीची, समाजपरिवर्तनाची मशाला हाती घेत ते आईला म्हणतात. 'आई, माझ्या शस्त्राचा तू आधार हो' परिवर्तनाच्या लढयात आई आणि मुलगा हे भावनिक नाते कवीला मान्य नाही. म्हणूनच ते आईला बजाजवतात– 'जर अशा निर्णायक क्षणाला तू जमीनदोस्त झालीस तर तुझ्या निश्चिेष्ट शरीरावरुन मला निर्दयपणे पुढे चालव लागेल !

पत्नीच्या विलोभनीय रुपाचे वर्णन करत त्याची कविता रोमॅन्टिक होत नाही. मार्क्सवादी विचारसारणीचा प्रभाव व त्याच्या तत्वज्ञानाची मांडणी करणारी 'माझ्या काळयासावळया लाडक्या मादीस' ही त्याची कविता क्रांतीची कविता ठरते,

**'तू आता स्त्रीन्स्त्री म्हणून राहिली नाहीस**
**मी आता पुरुषन्पुरुष म्हणून राहिलेलो नाही**
**नर आणि मादीच्या कल्पना या युगातच कशा पायदळी तुडवल्यात !**
**तू माझी दासी नाहीस, मी तुझा राजा नाही**
**आपण कॉम्रेड, आपण प्राणंतिक साथीदार !**
**हया प्रचंड विशमतेच्या देशात**
**तू व्हिएतनामी योध्दी झालीयस !**

जगाचा इतिहास हा वर्गलढयाचा इतिहास आहे. परिवर्तनासाठी संघर्ष हा अटळ आहे हे पत्नीला सांगाताना त्यांच्यासाठी ती केवळ बायको, मादी असत नाही तर प्राणांतिक साथीदार असलेली व्हिएतनामी योध्दी आहे.

स्त्री हा जगण्याचा आधार वाटणाऱ्या ढसाळांना तिच्याविषयी नेहमीच ओढ आणि माया वाटत आली आहे बाईला अंतकरणात हळवा कोपरा देणारा हा कवी म्हणतो,

**'मला हवा होता हात तुझा**
**कोसळताना आधारासाठी**

**नसलेल्या परमेश्वराजवळ**
**गुडघे टेकून मागायची होती क्षमा,**
**आयुष्यातल्या सर्व गुन्हयांची...**

रमाबाई आंबेडकर यांनी केलेला त्याग, कष्ट त्यांची सोशिकता समजून घेताना हा संवेदनशील कवी 'रमाबाई आंबेडकर ' या कवितेत म्हणतो,

**'पैसं पाठीवर घेऊन**
**पोरक्या ज्ञानेश्वराने**
**अमृतशी पैजा जिंकल्या**
**साहेबांच्या पाठीशी पैसं होऊन तू**
**गुलामांच्या उध्दाराच्या ज्ञानेश्वरीची**
**पहिली ओळ लिहायला मदत केलीस !**

ढसाळांच्या कवितेतील आई, बहिण, प्रेयसी, पत्नी, मंदिकिनी, शोभा, अनुराधा, रमाबाई, जरीना इ. स्त्रीप्रतिमा विलक्षण अनुभूतीतून प्रकटतात. वैयक्तिक दुःखाच्या सीमित वर्तुळात नामदेव ढसाळांची कविता फिरत नाही तर बाईच्या संवेदन विश्वाचा व्यापक परीघ ही कविता शब्दांकित करते म्हणूनच ढसाळ म्हणतात. 'वेदना आहे माझ्या कवितेचा मूलस्त्रोत.' 'राहीबाई', माझ्या जन्मगावच्या बायका ' 'मंदाकिनी पाटील मला अभिप्रेत असलेलं कोलाज,' 'मुंबई, मुंबई माझ्या प्रिय रांडे 'इ. कवितेत बाईच्या जातीच्या वेदना, दुःख व संघर्षनाचे चित्रण नामदेव ढसाळ करतात. देह विकून जगणाऱ्या बायका ढसाळांना पुरुषसत्ताक समजाव्यवस्थेच्या शोषणाचे प्रतिक वाटतात. स्त्री–पुरुषांचे नाते हे ढसाळांसाठी अत्यंतिक संवेदनशील व बहुपदरी आहे. शरीरवासना कामेच्छांच्या पलिकडे जावून ते बाईची व्यथा जाणून घेण्याचा प्रयत्न करतात.

**'वृशणातलं दु:ख घेऊन तिच्याकडे गेलो तर ती**
**रिकाम्या ग्लाससाठी कोरडी ठन्न !**
**मी मावळलो कामेच्छा'**

स्त्रियांच्या आुयष्याशी, दु:ख यातनेशी ढसाळांनी स्वतःला जोडून घेतले होते. म्हणूनच आई, बहिण, पत्नी, मावशी, मंदाकिनी, विनती, शुभदा, शोभा, अनुराधा, रमाबाई, जरीना, ती, रत्नमाला निळे या साऱ्या स्त्रियां आपला आकांत ढसाळांच्या कवितेतून मांडतात. नामदेव ढसाळ आपल्या कवितेतून करुण तडफडीने बाईचे संवेदनविश्व जाणून घेतात.

## निष्कर्ष :–

1. मराठी काव्यपरंपरेत बहुतांशी कवींनी आई, प्रेयसी, पत्नी या स्त्रीविषयक भूमिका शब्दचित्रीत करताना आई विषयीचा मन्हमंगलभाव, प्रेयसी व पत्नीचं विलोभनीय रुप याचाच विचार केला आहे. मात्र नामदेव ढसाळांनी या काव्यपरंपरेला छेद दिला आहे.
2. आपला उद्रेक, संताप, संवेदना, विचार, तत्वज्ञान सारं काही पणाला लावून नामदेव ढसाळ बाईपणांच गूढ जाणून घेत 'बाई' या वैश्विक रहस्याचे कंगोरे आपल्या कवितेतून संवेदनशीलपणे नोंदवितात.
3. नामदेव ढसाळ 'आईच्या समजुतीसाठी' या कवितेत मातृत्वाचे महन्मंगल स्तोत्र गाणाऱ्या काव्यपरंपरेला छेद देतात. एका युयुत्सू, क्रांतीची, समाजपरिवर्तनाची मशाला हाती घेत ते आईला म्हणतात. 'आई, माझ्या शस्त्राचा तू आधार हो' परिवर्तनाच्या लढयात आई आणि मुलगा हे भावनिक नाते कवीला मान्य नाही. मार्क्सवादी तत्वज्ञान या कवितेत दिसून येते.
4. पत्नीच्या विलोभनीय रुपाचे वर्णन करत त्याची कविता रोमॅन्टिक होत नाही. मार्क्सवादी विचारसारणीचा प्रभाव व त्याच्या तत्वज्ञानाची मांडणी करणारी 'माझ्या काळयासावळया लाडक्या मादीस' ही त्याची कविता क्रांतीची कविता ठरते.
5. वैयक्तिक दुःखाच्या सीमित वर्तुळात नामदेव ढसाळांची कविता फिरत नाही तर बाईच्या संवेदन विश्वाचा व्यापक परीघ ही कविता शब्दांकित करत असल्याचे दिसून येते.

## संदर्भ :–

1. प्रभा गणोरकर, 'चिंध्याची देवी आणि इतर कविता' लोकवाड्:मयगृह, मुंबई, 2012,पृ.9
2. ढसाळ नामदेव, 'या सत्तेत जीव रमत नाही', शब्द पब्लिकेशन, मुंबई ति.आ.2014
3. ढसाळ नामदेव, 'गांडू बगीचा' आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई प्र. आ. 1986

4. ढसाळ नामदेव, 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', मागोवा प्रकाशन, पुणे प्र.आ.1986
5. ढसाळ नामदेव, 'खेळ' प्रास प्रकाश, मुंबई ति.आ.1983
6. ढसाळ नामदेव, 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्रःप्रियदर्शनी', प्रभात प्रकाशन, द्वि.आ.ऑगस्ट 2001.